# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


जा.क्र.बार्टी/योजना विभाग/वेळापत्रक/२०२५-२०२६/६०५७ दिनांक. १०/०९/२०२५

## घोषणापत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे, मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत JEE/NEET परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे.त्या अनुषंगाने पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, नाशिक, छ. संभाजीनगर व लातूर या ठिकाणी प्रत्येकी JEE प्रशिक्षणासाठी ७५ व NEET प्रशिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्याची निवड करण्याकरिता बार्टी मार्फत दि. २५/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दि.२०/०८/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्जनोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत JEE व NEET करिता तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी दिनांक ०४/०९/२०२५ रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतीक्षा यादीतील पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर या ५ विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी **बार्टी येरवडा संकुल,४, कॉमरझोन आयटी पार्क, अंतर्गत रोड, जेल रोड, येरवडा, पुणे, महाराष्ट्र - ४११००६ येथे सकाळी १०:३०** वाजले पासून करण्यात येणार आहे. प्रशिक्षण ठिकाणानुसार कागदपत्रे तपासणी वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | प्रशिक्षणाचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १ | पुणे | १५/०९/२०२५ |
| २ | मुंबई | १५/०९/२०२५ |
| ३ | नाशिक | १६/०९/२०२५ |
| ४ | छ.संभाजी नगर | १७ /०९/२०२५ |
| ५ | लातूर | १८/०९/२०२५ |

नागपूर व अमरावती या दोन विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रादेशिक कार्यालय २०५, A विंग-सामाजिक न्याय विभाग (बार्टी उपकेंद्र), दीक्षाभूमी रोड, नागपूर येथे सकाळी १०:३०** वाजले पासून करण्यात येणार आहे.

| अनु क्र. | प्रशिक्षणाचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १ | अमरावती | १५/०९/२०२५ |
| २ | नागपूर | १६/०९/२०२५ |

**विद्यार्थ्यांनी  खालीलप्रमाणे नमूद कागदपत्रा सह उपस्थित राहावे.**

१. १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका .
२. रहिवासी दाखला .
३. उत्पन्नाचा दाखला.
४. जात प्रमाणपत्र.
५. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश असल्याने बोनाफाईड.
६. स्वाधार योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रतिज्ञापत्र. (सोबत नमुना जोडला आहे)

**टिप :-**

१. ऑनलाईन अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी JEE व NEET अशा दोन्ही प्रशिक्षणाकरिता अर्ज केलेले आहे.अशा विद्यार्थ्यांची निवड झाल्यास विद्यार्थ्यांनी कागदपत्रे तपासणी दरम्यान कोणत्याही एक प्रशिक्षणाची (JEE किंवा NEET) निवड करणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी..
( सुनील वारे )
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.**

# **प्रतिज्ञापत्र**

मी ------------------------------------------------------------रा.-------------------------------------------
-------इयत्ता---------मध्ये शिक्षण घेत आहे. माझी बार्टी मार्फत JEE/NEET चे प्रशिक्षणाकरीता --------------
-------------- येथे निवड झालेली असून मी------------------------------------------------या संस्थेत JEE/NEET प्रशिक्षण घेत आहे. तरी मी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतलेला आहे/नाही.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतला असल्याचे आढळून आल्यास मी नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील करीता प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

नाव-----------------------------

स्वाक्षरी--------------------------
-

ठिकाण:

दिनांक: